महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

Rs.2/-

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ ३० जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०३९ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हितासाठी मंत्रिमंडळाचे ठोस निर्णय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत 8 महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये विधि व न्याय, महसूल, ग्रामविकास, जलसंपदा, सहकार व पणन विभागांच्या निर्णयांचा समावेश आहे. दरम्यान, राज्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबवण्यात येणार आहे. या अभियानात अत्युत्कृष्ट काम केलेल्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसंच महिलांवरील अत्याचाराची प्रकरणं निकाली काढण्यासाठी गोंदिया, रत्नागिरी आणि वाशिम इथं विशेष न्यायालय स्थापन करण्यात येणार असल्याचा निर्णय देखील आजच्या बैठकीत घेण्यात आला.



**कोकाटेंचा राजीनामा नाहीच? :**

दुसरीकडे, वादग्रस्त वक्तव्य आणि विधानसभा सभागृहात मोबाईलवर रमी गेम खेळल्यामुळं कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून होत होती. त्यामुळं आज कोकाटेंचा राजीनामा घेतला जाईल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा होती. मात्र, कोकाटेंचा राजीनामा घेतला जाणार नसल्याची माहिती समोर येत आहे. माणिकराव कोकाटे यांना मंत्रिमंडळातून हटवण्याऐवजी त्यांना समज द्या, कारवाई नको, असा राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांचा सूर आहे. तसंच माणिकराव कोकाटेंचा राजीनामा घेण्याऐवजी त्यांच्याकडील खातं बदललं जाऊ शकतं, अशी सुद्धा माहिती समोर येत आहे. दरम्यान, माणिकराव कोकाटेंचा राजीनामा घेतला जाऊ नये, यासाठी नाशिकमधील शेतकरी शिष्टमंडळानं उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली आहे.

**'उमेद मॉल' मुळं बचत गटाच्या उत्पादनाना प्रोत्साहान मिळेल :**

"आजच्या बैठकीत महिला बचत गटासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. 'उमेद'- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत 10 जिल्ह्यात 'उमेद मॉल'ची उभारणी करण्यात येणार आहे. सध्या राज्यात 10 मॉल उभारण्यात येणार आहेत. यासाठी प्रत्येक मॉलला 20 कोटी रुपयांची तरतूद केली आहे, " अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिलीय. तसंच "या मॉलमुळं राज्यातील ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होईल आणि या महिला बचत गटाना प्रोत्साहन मिळेल," असंही गोरे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

१. राज्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबवणार. अभियानात अत्युत्कृष्ट काम केलेल्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांना एकूण 1 902 प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचा निर्णय.

२. 'उमेद'- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत 10 जिल्ह्यात 'उमेद मॉल' (जिल्हा विक्री केंद्र) ची उभारणी राज्यातील ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ

३. महाराष्ट्र व गोवा वकील परिषद, मुंबई यांना ॲडव्होकेट अकॅडमी स्थापन करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे कळवा येथे जमीन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

४. 'ई-नाम' योजनेची प्रभावी अंमलबजावणी. राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन होणार. त्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे सनियंत्रण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा

५. पिंपरी-चिंचवड (जि. पुणे) येथे दोन न्यायालयांची स्थापना. या न्यायालयांसाठी पदांना मंजूरी

६. वर्धा जिल्ह्यातील बोर मोठा प्रकल्प (ता. सेलू) प्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीअंतर्गत धरण व वितरण व्यवस्था नुतनीकरणाच्या कामासाठी 231 कोटी 69 लाख रुपयांच्या तरतूदीस मान्यता.

७. वर्धा जिल्ह्यातील धाम मध्यम प्रकल्प (ता. आर्वी) प्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीअंतर्गत धरण व वितरण व्यवस्था नुतनीकरणाच्या कामासाठी 197 कोटी 27 लाख रुपयांच्या तरतूदीस मान्यता.

८. महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी गोंदिया, रत्नागिरी आणि वाशिम येथे न्यायालय

---

## थोडक्यात महत्वाचे

### जिल्हा परिषद शिक्षण विभागाचा
## शिक्षक समायोजन कार्यक्रम अचानक रद्द
### जिल्ह्यातील शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - ठाणे जिल्ह्यातील १०४ माध्यमिक शाळांमधील अतिरिक्त शिक्षक समायोजन प्रक्रियेचा कार्यक्रम मंगळवारी सकाळी अकरा वाजता ठाण्यात टेंभी नाका येथील बी. जे. हायस्कूलमध्ये जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातर्फे आयोजित करण्यात आला होता. जिल्ह्याच्या विविध भागातील मुख्याध्यापक, शिक्षक, लिपिक मंगळवारी सकाळी दहा वाजताच ठाण्यातील नियोजित शाळेत हजर झाले. पण, तेथील कार्यक्रम रद्द झाल्याचे समजल्यावर शिक्षकांचा हिरमोड झाला.

समायोजनाचा कार्यक्रम रद्द करायचा होता तर माध्यमिक शिक्षण विभागाने संबंधित शाळांना पूर्वसूचना देणे गरजेचे होते. पण अशाप्रकारचा कोणताही निरोप माध्यमिक शिक्षण विभागाकडून देण्यात आला नसल्याचे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक, शिक्षकांनी सांगितले. ठाणे जिल्ह्याच्या उल्हासनगर, कल्याण, डोंबिवली, भाईंदर, भांडुप, बेलापूर, ठाणे, मुंब्रा भागातील इयत्ता पाचवी ते इयत्ता दहावीच्या वर्गाचे शिक्षक, मुख्याध्यापक या समायोजन प्रक्रियेसाठी मंगळवारी सकाळीच ठाण्यात हजर झाले होते.

ही प्रक्रिया मंगळवारी होणार नव्हती. तर माध्यमिक शिक्षण विभागाने रात्री किंवा सकाळीच तसे निरोप शिक्षकांना पाठविले असते तर शिक्षकांना ठाणे येथे सकाळच्या लोकल, बस गर्दीतून येण्याचा त्रास वाचला असता अशा प्रतिक्रिया शिक्षकांनी दिल्या. या प्रक्रियेमुळे अनेक शिक्षकांनी शाळेत जाण्याचे टाळले. समायोजन प्रक्रियेचा कार्यक्रम रद्द झाल्याचे समजल्यावर शिक्षकांनी घटनास्थळी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यावेळी तेथील एका लिपिकाने अशाप्रकारचे निरोप शिक्षकांना कळविले होते, असा पवित्रा घेतला. शिक्षकांनी ते मान्य केले नाही.

## टक्केवारीच्या नादात प्रकल्प रखडले
### - राजन विचारे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : नवीन ठाणे रेल्वे स्थानक, सेंटिस पूर्व प्रकल्प यांसारखे अनेक ठाण्यातील प्रकल्प टक्केवारीच्या नादात रखडले आहेत. या प्रकल्पांना चालना देण्यात सत्ताधारी अपयशी झाले असल्याचा आरोप ठाकरे गटाचे नेते माजी खासदार राजन विचारे यांनी केला. सोमवारी सॅटिस पूर्व प्रकल्पाचे गर्डर टाकण्याच्या कामाची पाहणी राजन विचारे यांनी केली.

ठाणे शहरातील पूर्वेकडे सॅटीस दोन या प्रकल्पाचे काम सुरू आहे. या प्रकल्पातील कोपरी रेल्वे पुलावरील गर्डर टाकण्याचे काम दोन दिवस सुरू आहे. राजन विचारे यांनी सोमवारी ठाणे महापालिकेचे अधिकारी, रेल्वे प्रशासनाचे अधिकारी यांच्यासोबत पाहणी दौरा आयोजित करून या गर्डरचे काम कितपत पूर्ण झाले आहे याची माहिती घेतली. तसेच सत्तेत असणाऱ्या कोणत्याही लोकप्रतिनिधींनी या ठिकाणी येऊन आढावा घेतला नाही आणि साधी पाहणी देखील केली नसल्याचा आरोप विचारे यांनी केला.

शिंदे गटाचे राजकारण फोडाफोडी, दमबाजी यात व्यस्त असल्याने त्यांना विकासाचे काहीही पडले नसल्याचेही ते म्हणाले. या मार्गावर ५९ खांब उभे करण्यात आले. परंतु गेल्या वर्षभरापासून ब्लॉक घेण्यासाठी रेल्वे कडे पाठपुरावा नसल्याने गर्डर टाकण्यास विलंब लागला होता. सध्याचे खासदार संसदेत फोटो काढण्यात व्यस्त आहेत बहुतेक त्यांना विकास कामांकडेही लक्ष देण्यास वेळ नसावा असा आरोप राजन विचारे यांनी खासदार नरेश म्हस्के यांचावर केला.

---

# काळू नदीच्या पुलाला भगदाड
## बांधकामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह ?



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर** : शहापूर-मुरबाड या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या या महामार्गावरील काळू नदीच्या पुलावर भगदाड पडल्याचे निदर्शनास आल्याने या पुलाच्या बांधकामाच्या दर्जाविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. तर यावर कायम स्वरूपाची तात्काळ उपाययोजना करावी अशी मागणी प्रवाशी करत आहेत.

महाराष्ट्र राज्य रस्ते व विकास महामंडळ अर्थात एमएसआरडीसीच्या नियंत्रणाखाली शहापूर- मुरबाड-म्हसा-पाटगाव-कर्जत 548- ए या राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण व मजबुतीकरण करण्याचे काम अजातगायत सुरु आहे. या मार्गावरील काळू नदीच्या पुलावरील जॉईंट असलेल्या भागातील सिमेंट गळून पडल्याने या पुलावर मोठा खड्डा पडलेला दिसून येत आहे.

या भगदाडात एखाद्या वाहनाचे चाक अडकून मोठा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येणार नसल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले. मुळात हा संपूर्ण रस्ता तयार होतांना कधीही जबाबदार अधिकारी पर्यवेक्षण करताना दिसून आला नसल्याने या रस्त्याच्या दर्जाबाबत शशांकता दिसून येत आहे. दरम्यान या काळू नदीवरील पुलावर पडलेल्या भगदाडाची तात्काळ दुरुस्ती करावी अशी मागणी प्रवाशी करत आहेत.

> **मागील आठ वर्षापासून सुरू असलेल्या या महामार्गाच्या कामामुळे स्थानिकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. दोन वर्षापूर्वी पावसाळ्याच्या आधी घाईघाईने या पुलाचे काम एमएसआरडीसीने पूर्ण केल्याने या पुलाचा सुरुवातीचा भाग खचला आहे. भविष्यातही या पुलामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.** ● दत्तात्रय एस. पाटील, उपसरपंच, ग्रुप ग्रामपंचायत दहिवली.

---

# सरकार अडचणीत येईल; अशी कृती करू नका !
## मुख्यमंत्र्यांची सर्व मंत्र्यांना पोस्ट कॅबिनेटमधे सूचना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारमधील सहकारी आणि महायुतीच्या सर्वच मंत्र्यांना पोस्ट कॅबिनेटमधे सक्त ताकीद दिल्याची माहिती आहे. कॅबिनेट बैठकीनंतर मंत्री महोदयांसोबत आयोजित विशेष बैठकीत मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्त करत मंत्र्यांना इशारा दिला. वादग्रस्त वक्तव्य टाळा, माध्यमांशी संवाद कमी करा, आणि जर वाद निर्माण होणारी कृती घडली तर तात्काळ स्वत: योग्य ते स्पष्टीकरण द्या, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केल्या आहेत. गेल्या काही दिवसांत महायुतीमधील मंत्र्यांच्या वक्तव्यावरुन आणि कृतीवरुन जनतेमध्ये तीव्र संताप व नाराजी पाहायला मिळत आहे. त्यावरुनच, विरोधकही आक्रमक होत मंत्र्यांचा राजीनामा मागत आहेत. त्याच, पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी पोस्ट कॅबिनेट घेत सूचना केल्या.

राज्य सरकारच्या कॅबिनेट बैठकीत आज 8 महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. मात्र, या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोस्ट कॅबिनेट घेत मंत्र्यांची कानउघडणी केली. महायुती सरकारमधील काही मंत्र्यांच्या वर्तणुकीवर प्रश्न उपस्थित करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माणिकराव कोकाटे असतील, शिवसेनेचे योगेश कदम आणि संजय शिरसाट यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. त्यामुळे, सरकारची प्रतिमा मलिन होत असल्याने मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली. यापुढे जर पुन्हा सरकारला अडचण निर्माण होईल अशी कृती झाली तर मला विचार करावा लागेल, अशा शब्दात देवेंद्र फडणवीस यांनी इशारा दिला आहे.










---



# माजी मंत्री सुरेश वरपुडकर भाजपात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**परभणी** : परभणी जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी राज्यमंत्री सुरेश वरपुडकर यांनी मंगळवारी आपल्या असंख्य समर्थकांसह भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी वरपुडकर व त्यांच्या सहकाऱ्यांचे स्वागत केले. प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विशेष उपस्थिती होती.



### न्यायालयाच्या आदेशानंतर
# दिव्यातील ११ इमारतींवर ठाणे मनपाचा हातोडा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर दिवा शीळ परिसरातील ११ अनधिकृत इमारतींवर ठाणे महापालिका हातोडा चालवणार आहे. पालिकेच्या निर्णयामुळे ११ इमारतीतील ३७२ कुटुंबे रस्त्यावर येणार आहेत. याआधीही दिवा शीळ खान कम्पाऊंड भागात उभारण्यात आलेल्या २१ अनधिकृत इमारतींवर पालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई केली आहे. त्यानंतर आता शिळ भागातील आणखी ११ इमारतींवर उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

त्यातील दोन इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत. उर्वरित इमारतींमध्ये रहिवाशांचे वास्तव्य असून एका इमारतीत तर एक खासगी शाळा आणि मस्जिद देखील आढळून आले आहे. या इमारतींमध्ये ३७२ कुटुंबे वास्तव्यास असल्याची माहिती पुढे आली आहे.

दिवा शिळ भागात खान कम्पाऊंड येथे ग्रीन झोनमध्ये उभारण्यात आलेल्या २१ इमारतींवर महापालिकेने महिनाभर कारवाई करीत येथील इमारती जमीनदोस्त केल्या आहेत. त्यानंतर याठिकाणी वृक्ष लागवड देखील सुरू केली आहे. ही कारवाई संपत नाही तोच उच्च न्यायालयाने शिळ भागातील दोन भागात उभारण्यात आलेल्या ११ अनधिकृत इमारतींवर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानंतर शनिवारपासून ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचा मोर्चा पुन्हा एकदा या भागाकडे वळाला आहे. त्यानुसार दोन दिवसात येथील दोन इमारतींवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच आणखी एक इमारत रिकामी करण्यात आली आहे. या इमारतींचे बांधकाम हे २०१८-१९ मध्ये झालेले असल्याची माहिती पालिकेने दिली आहे.

येथील एका जागेत १० इमारतींचे बांधकाम उभारण्यात आले आहे. याठिकाणच्या इमारती या ६ ते ८ मजल्यांच्या असून येथील सर्व इमारती व्याप्त असल्याचेही दिसून आले आहे. एका एका इमारतीत २० ते ४७ रुम असून ७० च्या आसपास गाळे आहेत. एका इमारतीत मस्जिद, एका इमारतीत क्लास आणि शाळादेखील सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ही शाळा आता रिकामी करण्यात आल्याचा दावा पालिकेच्या अतिक्रमण विभागाने केला आहे.

# गणेशघाट परिसरात खोदलेला रस्ता दुरुस्त करा : शिवसेनेची मागणी

## शिवसेना शाखा प्रमुख रोहन कोट यांचे केडीएमसी आयुक्तांना पत्र

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मोहने येथील पाणी पुरवठा विभागाने पाईपलाईन टाकण्यासाठी खोदकाम केले आहे. या पाईपलाईन मुळे गणेश घाट येथे श्री गणेश मूर्ती विसर्जन करण्यासाठी अडथळा निर्माण झाला आहे. त्या ठिकाणी लवकरात लवकर पोहच रस्ता तयार करण्यात यावा यासाठी मोहने प्रभाग क्रमांक 14 चे शिवसेना शिंदे गटाचे शाखाप्रमुख रोहन कोट यांनी केडीएमसी आयुक्तांना पत्र दिले आहे.

अमृत योजना अंतर्गत व उल्हास नदी पात्रातून अधिक पाणी इतर महानगरपालिका हद्दीत उपसा करण्यासाठी ज्या नवीन मोठ्या पाईपलाईन टाकण्यात आल्या आहेत. त्यासाठी उल्हास नदी पात्राच्या लगत जो मोहने गणेशघाट होता त्या ठिकाणी अनेक वर्षे श्री गणेश मूर्ती चे विसर्जन करण्यात येत आहे. त्यात घरगुती व गणेश मंडळाच्या मोठ्या मूर्त्यांचे विसर्जन



**यंदाच्या वर्षी मात्र गणेश घाट रस्त्यावर अमृत योजना अंतर्गत जे काम करण्यात आले आहे त्यामुळे गणेश विसर्जनाला अडथळा ठरणार आहे. त्यामुळे या ठिकाणची शाखाप्रमुख रोहन कोट यांनी पाहणी करून याबाबत गणेश विसर्जना पूर्वी हा अडथळा दूर करून त्या ठिकाणी गणेश घाट पर्यंत पोहच रस्ता तयार करून देण्याची मागणी**

मोठ्या संख्येने करण्यात येते. परंतु यंदाच्या वर्षी मात्र गणेश घाट रस्त्यावर अमृत योजना अंतर्गत जे काम करण्यात आले आहे त्यामुळे गणेश विसर्जनाला अडथळा ठरणार आहे. त्यामुळे या ठिकाणची शाखाप्रमुख रोहन कोट यांनी पाहणी करून याबाबत गणेश विसर्जना पूर्वी हा अडथळा दूर करून त्या ठिकाणी गणेश घाट पर्यंत पोहच रस्ता तयार करून देण्याची मागणी केली आहे. यबाबत त्यांनी केडीएमसी आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, शहर अभियंता, जल अभियंता, प्रोजेक्ट इंजिनिअर व अ प्रभाग सहाय्यक आयुक्त यांना लेखी निवेदन दिले आहे.

# मनशक्तीच्या वतीने मेंदूक्रांती कार्यशाळा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : 1 ते 7 वयोगटातील मुलांच्या पालकांसाठी पालकत्वाला आनंददायी व योग्य दिशा देणारी मार्गदर्शक मेंदूक्रांती कार्यशाळा मनशक्तीच्या कल्याण केंद्राच्या वतीने रविवार दिनांक 3 ऑगस्ट रोजी स.10 ते सं.5 या वेळेत कल्याण पश्चिमेतील गांधी चौक ब्राह्मणसभा पंडित वाडी याठिकाणी आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यशाळेत मुला-मुलींच्या हुशारीला वळण कसे लावावे. वाढलेले वर्तन विषयक प्रश्न कसे हाताळावेत. मोबाईल पासून मुला-मुलींना लांब कसे ठेवावे. मुलांचा सर्वांगीण विकास कसा करावा. मुलांच्या झोपेचा उपयोग वर्तनात्मक विकासासाठी कसा करावा या व अशा अनेक प्रश्नांची उत्तरे या कार्यशाळेत मिळतील. हि कार्यशाळा आई-बाबा, आजी, आजोबा आणि शिक्षक सर्वांसाठी उपयुक्त असून अधिक माहिती साठी संपर्क 9833110320

# आ. राजेश मोरे यांनी केली कचोरेतील घटनास्थळाची पाहणी



## कचोरे टेकडीवरील कोसळली होती सहा घरे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेतील कचोरे परिसरात माती खचल्याने पाच ते सहा घरांचे नुकसान झाल्याची घटना रविवारी घडली होती. याठिकाणी आज आमदार राजेश मोरे यांनी घटना स्थळी भेट देत पाहणी करत परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी आमदार राजेश मोरे यांच्यासमवेत केडीएमसीचे माजी परिवहन सभापती मनोज चौधरी उपस्थित होते. आमदार मोरे यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधत धीर दिला. नुकसान झालेल्या नागरिकांना शासनातर्फे तसेच शिवसेनेच्या वतीने सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

# भिवंडीत अवैध धंद्यांचा सुळसुळाट

## पोलिसांची हुक्का पार्लरवर कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहर परिसरात अनेक भागात अनाधिकृतपणे मटका, जुगार, दारू विक्री,अंमली पदार्थ विक्री व हुक्का पार्लर सुरू असल्याचे तक्रारी भिवंडी पोलीस उपाआयुक्त शशिकांत बारोटे यांच्या कडे जाताच त्यामुळे अवैध धंदयावर कडक कारवाई करण्याचे आदेश देताच भिवंडीतील नारपोली व शांतीनगर पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या दोन हुक्का पार्लर वर कारवाई करीत गुन्हे दाखल केले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील शांतीनगर परिसरातील गुलजार नगर येथे इरफान बिस्मीला खान याने आपल्या व्यावसायिक गाळ्यात बेकायदेशीर हुक्का पार्लर सुरू केला होता.त्याठिकाणी शांतीनगर पोलिसांनी रात्री बारा वाजताच्या सुमारास कारवाई केली असता तेथे इरफान बिस्मीला खान याने सुरू केलेल्या हुक्का पार्लर मध्ये मोहम्मद अरकम शाब्बीर शेख,हाजीनुर बादशाह शेख,अमीर गजनबी शेख असे तिघे ग्राहक हुक्का पिताना आढळून आले. पोलिसांनी तेथून 7 हजार रुपये किमतीचे चार हुक्का पॉट,तंबाखू मिश्रित फ्लेवर,अल्युमिनियम फॉईल व रोख रक्कम असा मुद्देमाल जप्त केला.याप्रकरणी शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

तर दुसऱ्या घटनेत मुंबई नाशिक भिवंडी बायपास महामार्गावरील हायवे दिवा येथील आर डी फार्म हाऊस ढाबा येथे हुक्का पिण्यासाठी ग्राहकांना पुरविला जात होता. नारापोली पोलिसांनी केलेल्या कारवाईत ढाबा व्यवस्थापक अफसर जफीरुद्दीन आलम व कामगार शुभम अमलेश कुमार,राजेश हरिलाल दास अशा तिघांविरोधात नारपोली पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

शहरातील नझराणा रोड, धामणकर नाका, भोईवाडा, नारपोली रोड,खाडीपार रोड,कणेरी रोड,निजामपूरा,भंडारी कंपाऊंड रोड, गैबीनगर, कामतघर ताडाळी रोड,अंजूरफाटा अशा विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात जुगार, मटका आणि अंमली पदार्थ विक्री करणे सारखे अवैध धंदे राजरोसपणे सुरू असुन पोलीस कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# चिंचघर - देवघर रस्ता दुरुस्तीसाठी धर्मवीर विचारमंचचा बिऱ्हाड मोर्चा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : वारंवार मागणी करून सुद्धा कुडूस ते देवघर रस्ता दुरुस्ती न झाल्याने आज धर्मवीर विचार मंचामार्फत सार्वजनिक बांधकाम विभाग वाडा कार्यालयावर बिऱ्हाड मोर्चाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विचारमंचच्या पदाधिकाऱ्यांसह मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थ कार्यालयाबाहेर ठाण मांडून बसले.

रस्त्यामुळे शालेय विद्यार्थी शेतकऱ्यांचे अतोनात हाल होत असताना मागण्या मान्य झाल्या शिवाय माघार घेणार नाही अशी भूमिका मोर्चेकऱ्यांनी घेतली.



# गीतासार

## अध्याय १८

## मोक्षसंन्यासयोगः

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥१८-५॥

यज्ञ, दान आणि तप रूप कर्म टाकणे योग्य नाही. उलट ते अवश्य केले पाहिजे. कारण यज्ञ, दान व तप ही तीनही कर्मे बुद्धिमान माणसांना पवित्र करणारी आहेत. ॥१८-५॥

एतान्यपि तु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा फलानि च ।कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥१८-६॥

म्हणून हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), ही यज्ञ, दान व तप रूप कर्मे तसेच इतरही सर्व कर्तव्य कर्मे आसक्ती आणि फळांचा त्याग करून अवश्य केली पाहिजेत. हे माझे निश्चित असे उत्तम मत आहे. ॥१८-६॥

नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते । मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ॥१८-७॥

(निषिद्ध आणि काम्य कर्मांचा तर स्वरूपतः त्याग करणे योग्यच आहे.) परंतु नियत कर्मांचा स्वरूपतः त्याग योग्य नाही. म्हणून मोहाने त्याचा त्याग करणे याला तामस त्याग म्हटले आहे. ॥१८-७॥

# आरोग्य

## व्हिटॅमिनच्या कमतरतेमुळे नैराश्याचे बळी

सनशाईन व्हिटॅमिन' म्हणून ओळखले जाणारे व्हिटॅमिन डी आपल्या शरीरासाठी आणि मनासाठी अत्यंत महत्वाचे आहे. शहरी जीवनशैलीमुळे आणि बहुतेक वेळ घरात घालवल्यामुळे, व्हिटॅमिन डीची कमतरता खूप सामान्य झाली आहे.

कमतरतेची लक्षणे : सतत थकवा आणि अशक्तपणा जाणवणे ,कोणत्याही कारणाशिवाय दुःखी, नैराश्य जाणवणे,झोपेच्या समस्या होणे कमी ऊर्जा पातळी

व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे आपल्या मेंदूतील मूड आणि भावना नियंत्रित करणाऱ्या न्यूरोट्रांसमीटर (रसायन) च्या उत्पादनावर परिणाम होतो. म्हणून त्याची योग्य पातळी राखणे खूप महत्वाचे आहे.

**व्हिटॅमिन डी कसे वाढवायचे?**

दररोज सकाळी 8 ते 10 च्या दरम्यान किमान 20 मिनिटे उन्हात बसा. हिरव्या भाज्या खा. जर तुमचे डॉक्टर सल्ला देत असतील तर व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स देखील घ्या.

**व्हिटॅमिन बी 12 ची कमतरता आणि मानसिक आरोग्य**

व्हिटॅमिन बी12 आपल्या मज्जासंस्थेसाठी आवश्यक आहे. त्याच्या कमतरतेमुळे केवळ थकवा आणि अशक्तपणा येत नाही तर मूड स्विंग, एकाग्रतेचा अभाव, विसरणे आणि नैराश्य देखील येऊ शकते.

लक्षणे: सतत थकवा आणि अशक्तपणा,लक्ष केंद्रित करण्यात समस्या,स्मृती कमी होणे,उदासीन मनःस्थिती आणि चिडचिडेपणा

**व्हिटॅमिन बी 12 ची कमतरता कशी भरून काढायची? :** बी12 तृणधान्यांमध्ये मजबूत आढळते. गरज पडल्यास, तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतर पूरक आहार घ्या.

फोलेट (व्हिटॅमिन बी9) ची कमतरता आणि त्याचे मूडवर होणारे परिणाम ,फोलेट हे आपल्या मानसिक आरोग्यासाठी देखील एक महत्त्वाचे जीवनसत्व आहे. त्याच्या कमतरतेमुळे नैराश्य आणि चिंता देखील होऊ शकते. फोलेट प्रामुख्याने हिरव्या पालेभाज्या, कडधान्ये आणि फळांमध्ये आढळते.जर तुम्हाला सतत दुःख, चिंता, थकवा किंवा कोणत्याही कारणाशिवाय झोप न लागणे जाणवत असेल आणि हे तुमच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करत असेल, तर नक्कीच डॉक्टरांशी संपर्क साधा. केवळ व्हिटॅमिनची कमतरताच नाही तर अनेक वेळा नैराश्य इतर मानसिक समस्यांमुळे देखील होऊ शकते.

**योग्य आहार आणि जीवनशैली वापरून नैराश्य कसे टाळावे**

**व्हिटॅमिन डी, बी12, फोलेट आणि इतर** आवश्यक पोषक तत्वांचा समावेश असलेला संतुलित आहार घ्या. दररोज सकाळी किमान 20 मिनिटे उन्हात घालवा.तुमचे मन सक्रिय आणि आनंदी ठेवण्यासाठी नियमित व्यायाम करा.ताण कमी करण्यासाठी ध्यान किंवा योग करा.पुरेशी झोप घ्या.

### गुंज फाऊंडेशनच्या माध्यमातून

# शिरवली जि.प शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मंगळवार 29 जुलै रोजी शिरवली जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना गुंज फाऊंडेशन व तानाजी घागस यांच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. तसेच पंचायत समितीचे कृषी विभागाचे अधिकारी रवींद्र चौधरी यांच्या उपस्थितीमध्ये विविध शेतकरी योजनेचे फॉर्म वितरित करून फॉर्म भरण्यात आले. याप्रसंगी डी.वाय. फाऊंडेशनच्या ठाणे जिल्हा अध्यक्षा चारुशीला गायकर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. तर सामाजिक कार्यकर्ते उमेश चौधरी, न्हावे ग्रामपंचायत सरपंच जगदीश हिंदुराव, कळमखांडे गावचे सरपंच भालचंद्र कापडी, तोंडली गावच्या सरपंच सौ. सुषमा पडवळ शिरवली गावचे माजी सरपंच तुकाराम घागस ,जगन घागस सेवा सोसायटीचे माजी चेअरमन दत्तात्रय कथोरे, माजी उपसरपंच गोपाळ जमदरे गावचे पोलीस पाटील हर्षल घागस गावच्या सीआरपी दीक्षा आगिवले, कृषी सखी सुरेखा दिनेश शिरोशे, सेवा सोसायटीचे सदस्य हरिश्चंद्र शिरोशे, भास्कर गायकर, गावचे ज्येष्ठ नागरिक भाऊ हरड दत्तात्रेय घागस शाळेचे मुख्याध्यापक उबाळे सर्व शिक्षक वर्ग ज्येष्ठ कार्यकर्ते दिलीप पष्टे दत्तात्रेय आगिवले पंढरीनाथ भोईर अभ्यासू पत्रकार दिलीप पवार, शिरवली ग्रामपंचायतच्या माजी सरपंच हौसाबाई बांगारा तसेच मोठ्या संख्येने महिला वर्ग ग्रामस्थ तरुण मित्र मंडळ कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व एज्युकेशन पॅड वाटप करण्यात आले. गुंज संस्थेच्या वतीने हा कार्यक्रम संपन्न झाला संस्थेचे व्यवस्थापक मुरबाड तालुक्याचे दत्तात्रय पाटील यांनी विद्यार्थ्यांना साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे विशेष आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला शेतकऱ्यांचे योजनेचे फॉर्म भरून दिल्याबद्दल शेतकरी वर्ग अतिशय आनंदी वातावरणामध्ये दिसून आला गावचे माजी सरपंच तानाजी घागस यांनी विकास कामाबद्दल गावासोबत कटिबद्ध राहण्याचे आश्वासन या ठिकाणी दिले. अतिशय आनंदी वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला खाऊ वाटप करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष चारुशीला गायकर यांनी आपल्या भाषणात भविष्यामध्ये शाळेला जी काय मदत लागेल ते आम्ही करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करू असे आश्वासित करून कार्यक्रम संपन्न झाला.

### दिल्लीमध्ये महाराष्ट्र शासनामार्फत उभारण्यात येणाऱ्या

# सांस्कृतिक भवनाचा आराखडा मुख्यमंत्र्यांना सादर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : दिल्लीतील 98 व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या समारोप कार्यक्रमात महाराष्ट्र शासनामार्फत दिल्लीमध्ये बहुउद्देशीय सांस्कृतिक भवन उभारण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. महाराष्ट्र सदन परिसरात त्यासाठी जागा निश्चित करण्यात आली असून त्याचा प्रस्तावित आराखडा निवासी आयुक्त तथा सचिव आर विमला यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नुकताच सादर केला.

मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या दिल्ली दौऱ्यावेळी महाराष्ट्र सदनाच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीत श्रीमती आर विमला यांनी विविध प्रस्ताव सादर केले. यामध्ये प्रामुख्याने सांस्कृतिक भवनाबाबत सविस्तर चर्चा झाली. या सांस्कृतिक भवना मध्ये



बहूउद्देशीय सभागृह, महाराष्ट्रातील भारतीय प्रशासकीय सेवेतील विविध पदांसाठी मुलाखत पात्र उमेदवारांसाठी निवास व्यवस्था, प्रशस्त ग्रंथालय व अभ्यासिका व अनुषंगिक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा झाली.

तसेच महाराष्ट्र सदन परिसरातील अधिकारी व कर्मचारी निवास स्थाने आणि अन्य प्रशासकीय बाबींसंदर्भात सविस्तर सादरीकरण निवासी आयुक्त श्रीमती विमला यांनी केले. यासह महाराष्ट्रातील ऋतूनिहाय फळांचे प्रदर्शन व विक्री दालन आणि बचत गटांच्यामार्फत उत्पादित वस्तूंचे प्रदर्शन दालन वर्षभरासाठी य ठिकाणी असावे या संदर्भात सुरु असलेल्या नियोजनची माहिती यावेळी देण्यात आली. महाराष्ट्र महोत्सव दिल्लीत आयोजित करण्यात यावा यामध्ये महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे दर्शन घडाविणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम करण्याचे प्रस्तावित आहेत. यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी श्रीमती विमला यांनी यावेळी केली. मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी यासर्व प्रकल्पाबाबत सकारात्मकता दर्शविली असून पुढील कार्यवाही करण्यासंदर्भात सूचना दिल्या.

या सादरीकरणास सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, महाराष्ट्र परिचय केंद्राच्या प्रभारी उपसंचालक मनीषा पिंगळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता किरण चौधरी, विद्युत विभागाचे आशुतोष द्विवेदी, माहिती अधिकारी अंजु निमसरकर कांबळे, महाराष्ट्र सदनाचे प्रभारी व्यवस्थापक प्रमोद कोलपते आदी उपस्थित होते.






# अपघात टाळण्यासाठी सर्व यंत्रणांनी उपाययोजना करा

## - जिल्हाधिकारी किशन जावळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रस्ते अपघात टाळण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणानी सार्वजनिक बांधकाम विभाग,राष्ट्रीय महामार्ग तसेच परिवहन विभाग यांनी तातडीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात. भविष्यातील अपघात टाळण्याच्यादृष्टीने नियोजन करावे, यापुढे या सर्व मार्गांवर रस्ते दुरुस्तीअभावी अपघात घडल्यास संबंधित यंत्रणेवर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी जावळे बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक आचल दलाल, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांसह सर्व कार्यन्वयीन यंत्रणा उपस्थित होते.

बैठकीमध्ये रायगड ग्रामीण पोलीस तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गेल्या वर्षात झालेल्या अपघातांचा व त्या अनुषंगाने केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, एनएचएआय, एमएसआरडीसी, सार्वजनिक बांधकाम-राष्ट्रीय महामार्ग विभाग, पनवेल महानगरपालिका हद्दीतील धोकादायक अपघात ठिकाणांबाबतचा (ब्लॅकस्पॉट) आढावा घेऊन केलेल्या उपाययोजना व त्यानंतर अपघात प्रमाणात झालेली घट याबाबत चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्ह्यात महामार्ग, राज्य मार्ग यांवरील ब्लॅक स्पॉट शोधून त्यावर उपाययोजना, दर्शक सुचना फलक लावणे, वेग मर्यादा दर्शक फलक लावणे,




महामार्गावर अनधिकृतरित्या डिव्हायडर तोडून ठेवले आहेत,ते पुन्हा स्थापीत करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करणे आदी उपाययोजना राबवाव्या. जिल्ह्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण शून्यावर आणणे, अपघातानंतर जखमींना तात्काळ उपचार सुविधा उपलब्ध करुन मृत्यूदर शून्यावर आणणे या उद्धिष्टांसह हे काम गांभीर्याने करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी दिले.

दरम्यान व्यवसायाला लाभ व्हावा यासाठी काही व्यावसायिक मुख्यमार्गिका आणि सेवारस्ता यामधील डिव्हायडर तोडत असल्याचे निदर्शनास आले आहे. सेवारस्त्यावरील वाहन अचानक थेट मुख्य मार्गिकेवर तसेच मार्गिकेवरील वाहन अचानक वळत असल्यामुळे अपघात होऊ शकतात. त्यामुळे या व्यावसायिकांच्या विरोधात कठोर कारवाईची शिफारस यावेळी करण्यात आली. तसेच वाहतुकीला अडथळे आणणाऱ्या होर्डिंगला तातडीने हटविण्याचे निर्देश देखील जिल्हाधिकारी जावळे यांनी दिले.

आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करावेत असे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी यावेळी संबंधित यंत्रणाना दिले.यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी पेण, पनवेल, अधीक्षक अभियंता, रेसीलीयंट इंडिया नाशिक (एन जी ओ) या संस्थानी आपले सादरीकरण केले.




**मेष**

व्यक्तिमत्वात आणि स्वभावात झालेला बदल उत्कृष्ट असेल. सामाजिक आणि कौटुंबिक सदस्यांकडूनही तुम्हाला विशेष सन्मान मिळेल.

**वृषभ**

आज तुम्हाला हे लक्षात ठेवावे लागेल की एखाद्या व्यावसायिकाशी भांडण सारखे प्रसंग उद्भवू शकतात. यामध्ये तुमच्या रागावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

**मिथुन**

तुमच्याबद्दलची कोणतीही खास गोष्ट कोणाशीही शेअर करू नका. अति स्वकेंद्रित असण्याने आणि अहंकाराची भावना असल्यामुळे संबंधांमध्ये तणाव निर्माण होतो.

**कर्क**

ध्येय निश्चित करण्यासाठी नवीन योजना कराल, ही योजना भविष्यात प्रभावी ठरेल. आरोग्याशी संबंधित किरकोळ समस्यांमुळे आळस हावी राहील.

**सिंह**

घरात काही महत्त्वाच्या व्यक्तीच्या आगमनामुळे एखाद्या विषयावर सकारात्मक चर्चा होईल.व्यावसायिक कामकाजात सुधारणा होण्याची अपेक्षा करू नका.

**कन्या**

दिवसआनंदाने भरलेला दिवस सुरू होणार आहे. कौटुंबिक बाबींमध्ये थोडी घाई करावी लागेल. तुमच्या योगदानामुळे आदर आणि सन्मान देखील वाढेल.

**तूळ**

तुमच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल होईल आणि तुमच्या जीवनशैलीबद्दल अधिक जागरूक राहणे इतरांच्या आकर्षणाचे केंद्र बनेल.

**वृश्चिक**

विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांचे पूर्ण सहकार्य मिळेल. आज तुम्ही तुमची लपलेली प्रतिभा ओळखून सर्जनशील कार्यात त्याचा वापर कराल.मानसिक बळ मिळेल.

**धनु**

प्रलंबित देयके गोळा करण्यासाठी आणि आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी ही वेळ चांगली आहे. सर्व मेहनत आणि शक्ती तुमच्या कामात वाहून घ्याल.

**मकर**

तुमची वैयक्तिक कामेही आज बऱ्याच प्रमाणात सुरळीतपणे पूर्ण होतील.अज्ञात व्यक्तीशी जास्त संवाद साधल्याने तुमचे नुकसान होऊ शकते.

**कुंभ**

कोणतेही प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस योग्य आहे. कोणतीही योजना राबवण्यापूर्वी कुटुंबातील सदस्यांचा सल्ला अवश्य घ्या.

**मीन**

काम करण्यापूर्वी त्याच्याशी संबंधित माहिती घेतल्यास अधिक यश मिळेल. प्रतिभा ओळखाल आणि दिनचर्या आणि कामाचा क्रम पूर्ण उर्जेने सांभाळाल.



जीवनदीप महानगर

पान : ०३

ठाणे ■ बुधवार

■ ३० जुलै २०२५

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मराठी तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी

# सरकार सुरु करणार ॲप आधारित प्रवासी वाहनसेवा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्य सरकारने मराठी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी ॲप आधारित प्रवासी वाहनसेवा सुरू करण्याच्या विचारात असून प्रवासी वाहतुकीसाठी ॲप आधारित रिक्षा, टॅक्सी व ई-बाईक सेवा आता खासगी कंपन्यांपुरती मर्यादित न राहता, परिवहन विभागाच्या सहकार्याने सुरू करण्यात येणाऱ्या या ॲप ला जय महाराष्ट्र, महा - राईड, महा-यात्री, महा-गो यापैकी एखादे नाव देणे प्रस्तावित आहे. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या अंतिम मान्यतेने सदर शासकीय ॲप लवकरच कार्यान्वित होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, या उपक्रमाअंतर्गत ॲप विकसित करण्यासाठी 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सपोर्ट टेक्नॉलॉजी' आणि 'मित्र' या संस्थेसह खासगी कंपन्यांशी चर्चा सुरू करण्यात आली आहे. यंत्रणेत पारदर्शकता ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींचा समावेश यात असून लवकरच ॲप तयार होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या अंतिम मान्यतेने सदर शासकीय ॲप लवकरच कार्यान्वित होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, या उपक्रमाअंतर्गत ॲप विक सित करण्यासाठी 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सपोर्ट टेक्नॉलॉजी' आणि 'मित्र' या संस्थेसह खासगी कंपन्यांशी चर्चा सुरू करण्यात आली आहे. यंत्रणेत पारदर्शकता ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींचा समावेश यात असून लवकरच ॲप तयार होणार आहे.




# क्रेनखाली चिरडून वाहतूक पोलिसाचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशी :** नवी मुंबई येथील महापे भागात कर्तव्यावर असलेले वाहतुक शाखेतील पोलीस हवालदार गणेश पाटील यांचा महापे उड्डाणपुलाखाली वाहतूक नियमन करत असताना क्रेनखाली येऊन मृत्यू झाला. या घटनेनंतर शहरातील अवजड वाहनांच्या सुरू असलेल्या बेदरकारकार वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आला असून मनसेने याबाबत आक्रमक पवित्रा घेतला आहे. मनसेच्या शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांची भेट घेऊन अवजड वाहतुक संदर्भात महत्त्वाची मागणी केली आहे. अवजड वाहने, क्रेन यांच्या वाहतुकीमुळे नवी मुंबईकरांची डोकेदुखी वाढली आहे. वाहतुक कोंडी, बेदरकारपणे वाहने चालिवणे यामुळे नवी मुंबईकर त्रस्त झाले आहेत. त्यामुळे या अवजड वाहतुकीतून नागरिकांना दिलासा द्यावी अशी मागणी जोर धरू लागली आहे. महापे भागात वाहतुक पोलीस हवालदार गणेश पाटील हे २४ जुलैला वाहतुकीचे नियमन करत होते. त्यावेळी एका क्रेनखाली आल्याने त्यांचा मृत्यू झाला. घटनेनंतर नवी मुंबई पोलीस दलात हळहळ व्यक्त केली जात आहे. या संदर्भात मनसे प्रवक्ते व शहराध्यक्ष गजानन काळे आणि मनसे वाहतूक सेना सरचिटणीस नितीन खानविलकर यांच्या नेतृत्वाखाली मनसे शिष्टमंडळाने नेरुळ पूर्व येथील कार्यालयात नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन गवांदे यांची भेट घेतली. तसेच, त्यांच्याकडे मागणी केली. या बाबतीत वाहतूक विभागाने भरारी पथके नेमून अवजड वाहने, शालेय बस यांच्यावर कारवाई करावी अशी सूचना गजानन काळे यांनी उप प्रादेशिक अधिकारी गजानन गवांदे यांना केली. तसेच नियम न पाळणाऱ्या वाहतूकदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी अधिकाऱ्यांनी लवकर वरील सर्व बाबींवर कारवाई करू असे आश्वासन मनसे शिष्टमंडळाला दिले.





# स्थानिकांनी स्वखर्चातून भरला चक्कीनाका येथील जीवघेणा खड्डा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** चक्कीनाका येथील एका खासगी रुग्णालयासमोर काँक्रीट रस्त्याच्या शेवटच्या टोकावर मोठा सहा फूट लांबीचा खड्डा निर्माण झाला आहे. वारंवार तक्रारी करूनही कोणत्याही उपाययोजना होत नसल्याने शेवटी स्थानिक नागरिकांनीच स्वखर्चातून सिमेंट ओतून हा खड्डा भरण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, सततच्या पावसाने हा खड्डा भरण्यास यश आले नाही.

मे महिन्यापासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे यंदा शहरातील रस्त्यांची जुलै महिन्यातच वाताहत झाली आहे. डांबरी रस्ते जागोजागी उखडले असून, त्यात पावसाचे पाणी साचून लहान-मोठी डबकी तयार झाली आहेत. यामुळे वाहनांना खड्डयांच्या खोलीचा अंदाज न आल्याने अपघाताचा धोका आहे. परिणामी, वाहनचालक व प्रवासी दोघांनाही त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

चक्कीनाका येथेही काहीशी अशीच परिस्थिती उद्भवल्याने स्थानिकांनी स्वतःच खड्डा भरण्याचा प्रयत्न केला. जवळपास खासगी रुग्णालय असून, या मार्गाहून दिवसभरात रुग्णवाहिका भरवेगाने धावत असतात. यामुळे प्रशासनाने गंभीर दखल घेण्याची मागणी वाहनचालकांकडून होऊ लागली आहे.

# राज्यात मानसिक विकारामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, ता. 29 :** राज्यात मानसिक आजार ही एक गंभीर आरोग्य समस्या बनली आहे. आरोग्य विभागाच्या आरटीआयमधून मिळालेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात मागील पाच वर्षांत मानसिक आरोग्य समस्यांशी संबंधित मृत्यूंमध्ये आश्चर्यकारक वाढ झाली आहे.

मानसिक आणि वर्तणुकीशी संबंधित विकारांमुळे पाच वर्षांत ५,७८८ लोकांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. या आकडेवारीचे मूल्यांकन केल्यास राज्यात दररोज दर तीन जणांचा मानसिक आजाराने मृत्यू होत असल्याची बाब समोर येते.

**मृत्यूंमध्ये वाढ - धक्कादायक आकडेवारी**

| वर्ष | मृत्यू | पुरुष | महिला |
|---|---|---|---|
| २०२० | १,१७१ | ९०२ | २६९ |
| २०२१ | १,५९९ | १,१९० | ४०९ |
| २०२२ | १,०७३ | ---- | ---- |
| २०२३ | १,९१९ | ---- | ---- |



मानसिक आरोग्याशी संबंधित विकारांमुळे होणाऱ्या मृत्यूंबद्दल माहितीच्या अधिकारांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागाकडून माहिती मागवण्यात आली होती. आरोग्य सेवा संचालनालयाचे उपसंचालक डॉ. एस. बी. चिद्वार यांनी माहिती अधिकारांतर्गत दिलेल्या माहितीत म्हटले आहे, की २०१९ ते २०२३ या काळात विविध मानसिक आजारांमुळे पाच हजार ७८८ लोकांचा मृत्यू झाला आहे. २०१९ पासून राज्यात मानसिक आणि वर्तणुकीशी संबंधित विकारांपैकी एक असलेल्या मेंटल डिसॉर्डरमुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये अचानक आणि तीव्र वाढ झाली आहे.

मादक पदार्थांच्या अतिसेवनामुळे मानसिक आजारात वाढ होते, असेही तज्ज्ञ प्रवृत्तीचे कारण देतात. ही अशी स्थिती आहे की, जी मेंदूच्या कार्यप्रणालीमध्ये बदल घडवून आणते तसेच निर्णय घेण्याच्या क्षमतेवर परिणाम करते. मनोसक्रिय (सायकोएक्टिव्ह) पदार्थांमध्ये अल्कोहोल, निकोटीन, गांजा, कॅफिन आणि प्रिस्क्रिप्शन ड्रग्ज तसेच हेरॉइन, एलएसडी, कोकेन आणि अॅम्फेटामाइन्स यासारखी बेकायदा पदार्थांचा समावेश आहे.

**४५ ते ५४ वयोगटातील अधिक मृत्यू :** माहितीनुसार २०१९ ते २०२३ दरम्यान महाराष्ट्रात मानसिक आणि वर्तणुकीशी संबंधित विकारांमुळे एकूण ५,७८८ लोकांचा मृत्यू झाला. ४५ ते ५४ वयोगटातील सर्वाधिक ९९६ मृत्यू झाले. त्यानंतर ३५ ते ४४ वयोगटातील ९३९ मृत्यू झाले. चिंताजनक बाब म्हणजे १५ ते २४ वयोगटातील व्यक्तींमध्येही २७७ मृत्यूंची नोंद झाली.

## सरकारच्या उपाययोजना

वाढत्या मानसिक मृत्यूच्या समस्येला तोंड देण्यासाठी राज्य सरकारने अनेक पावले उचलली आहेत. सर्व ३६ जिल्हा रुग्णालयांत मानसिक आरोग्यसेवा सुरू केल्या आहेत. प्रत्येक रुग्णालयात एक मानसोपचारतज्ज्ञ, एक क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट, एक मानसोपचार परिचारिका आणि एक सामाजिक कार्यकर्ता आहे. याव्यतिरिक्त मानसिक आरोग्यसेवेमध्ये प्रवेश आणि लवकर हस्तक्षेप वाढविण्यासाठी ऑक्टोबर २०२२ मध्ये टेली मानस हेल्पलाइन सेवा सुरू केली. २४ तास उपलब्ध असलेल्या टोल-फ्री हेल्पलाइन क्रमांकावर (१४४१६) वर्षाला ५० हजारांहून अधिक कॉल येतात. त्यापैकी बहुतेक कॉल नैराश्याबद्दल असतात. याशिवाय सामाजिक आणि कामाच्या ठिकाणी ताणतणाव, विविध प्रकारची चिंता, अपयशाची भीती आणि नातेसंबंधातील समस्या येतात.

# पालघर जिल्ह्यातील सरपंच पदाची आरक्षण सोडत रद्द

## ५९ पदांसाठी आज नव्याने सोडत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** पालघर जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाची ७एप्रिल २०२५ रोजी काढण्यात आलेली आरक्षण सोडत रद्द करण्यात आली आहे. नव्याने पालघर तालुक्यातील ४७ व वसई तालुक्यातील १२ अशा ५९ पदांकरिता ही आरक्षण सोडत ३० जुलै रोजी सकाळी ११ वाजता तालुक्यातील तहसीलदार कार्यालय सभागृहात नव्याने काढण्यात येणार आहे.

सन २०२५ ते सन २०३० या कालावधीसाठीची पालघर जिल्ह्याच्या आरक्षण सोडतीबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांनी २२ जुलै २०२५ रोजी काढलेल्या आदेशानुसार ७ एप्रिल २०२५ रोजी झालेली पालघर तालुक्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींपुरती सरपंच पद आरक्षण सोडतीची संपूर्ण प्रक्रिया आणि तिचे इतिवृत्त रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे सन २०२५ ते सन २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण नव्याने निश्चित करण्याचे अधिकार पालघर तहसीलदार कार्यालयास प्रदान करण्यात आले आहेत.




मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील तरतुदींनुसार ही नवीन आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. पालघर जिल्ह्याचे तहसीलदार रमेश शेंडगे यांनी या संदर्भात पंचायत समिती पालघरच्या गट विकास अधिकारी व प्रत्येक ग्रामपंचायतीच्या प्रतिनिधींनी ३० जुलै रोजी उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत. या अनपेक्षित बदलामुळे जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणुकांच्या तयारीवर परिणाम होणार असून सरपंचपदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांमध्ये पुन्हा एकदा उत्कंठा वाढली आहे. सोडत रद्द होण्याचे कारण प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आलेले नाही.

# भिवंडीत भटक्या कुत्र्यांची दहशत

## सहा महिन्यांत सहा हजारांहून अधिक श्वानदंश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहरात भटक्या कुत्र्यांची चांगलीच दहशत वाढली आहे. मागील सहा महिन्यांत शहरात सहा हजारांहून अधिक नागरिकांचे लचके तोडल्याचे उघड झाले आहे. उपजिल्हा रुग्णालयातून ही माहिती समोर आली आहे. त्यामुळे भटक्या कुत्र्यांच्या निर्बिजीकरणाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून रस्त्यावरून चालताना नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन ये-जा करावी लागत आहे.

भिवंडी शहरात भटक्या कुत्र्यांनी उच्छाद मांडला असून दोन दिवसांपूर्वी शहरातील दर्गा रोड परिसरातील एका पिसाळलेल्या कुत्र्याने एकाच दिवशी ११ जणांना चावा घेतल्याची घटना घडली होती. यापैकी एक इमारतीमध्ये उभ्या असलेल्या व्यक्तीवर श्वानाने चढवलेला हल्ला सीसीटीव्हीमध्ये



जानेवारी - १०६६,
फेब्रुवारी - १०४२,
मार्च - ११०४,
एप्रिल - ९८८,
मे - १०००
जून - ६८९

जुलै महिन्यात पंधरा दिवसांमध्ये ३६१ असे सहा महिन्यांत एकूण **६२५० श्वानदंश**

### उपजिल्हा रुग्णालयातून धक्कादायक माहिती समोर

कैद झाला आहे. यामुळे शहरातील भटक्या श्वानांचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. उपजिल्हा रुग्णालयाच्या आकडेवारीवरून भिवंडीत जानेवारी १०६६, फेब्रुवारी १०४२, मार्च ११०४, एप्रिल ९८८, मे १०००, जून ६८९ व १५ जुलै २०२५ या पंधरा दिवसांमध्ये ३६१ असे सहा महिन्यांत एकूण ६२५० श्वानदंश झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

भटक्या कुत्र्यांचा वावर वाढल्याने तत्कालीन आयुक्त अजय वैद्य यांनी 12 वर्षे बंद असलेले श्वान निर्बिजीकरण केंद्र पुन्हा सुरू केले आहे. हैदराबादच्या 'वेट्स सोसायटी फॉर अनिमल वेल्फेअर असोसिएशन' संस्थेला पाच वर्षांसाठी या कामाचा ठेका देण्यात आला आहे. या संस्थेस प्रतिश्वान निर्बिजीकरण करण्यासाठी १४५० रुपये दिले जात आहेत. ११ नोव्हेंबर २०२४ ते १५ जुलै २०२५ या दरम्यानच्या काळात शहरातील एकूण ३२७५ श्वानांवर निर्बिजीकरण व रेबिज प्रतिबंधक लस देण्यात आली असल्याची माहिती स्वच्छता विभागाचे प्रमुख फैजल तातली यांनी दिली आहे.

# सिडकोच्या कार्यालयाला गळती

### कार्यालयीन कागदपत्रे, दस्तावेजांवर ताडपत्रीचे आवरण टाकण्याची नामुष्की

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** वाशी येथे सिडकोच्या कार्यालयाला पावसाळ्यात गळती लागली असून मोठ्या प्रमाणात कार्यालयात पाणी साचत आहे. छत, भिंती यामधून होणाऱ्या गळतीमुळे सर्व कार्यालयीन कागदपत्रे, दस्तावेजांवर ताडपत्रीचे आवरण टाकण्याची नामुष्की ओढवली आहे. अशा वातावरणात काम करताना कर्मचारीही त्रस्त झाले आहेत.

वाशी येथे सिडको कार्यालयाची इमारत असून या ठिकाणी अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय आहे. वाशीतील सिडकोचा गाडा येथूनच हाकला जातो. सिडकोने नवी मुंबई शहर नियोजनबद्ध उभे केले असले तरी सध्या त्यांचेच कार्यालय जीर्ण अवस्थेत आहे. वाशीतील या कार्यालयात सर्व भिंतींना ओल आली असून त्यातून पाणी गळत आहे. तुटलेल्या खिडक्या, लटकते तावदान, कोंदट वास अशा वातावरणात कर्मचाऱ्यांना काम करावे लागत आहे.

वाशी कार्यालयातील अनेक महत्त्वाची कागदपत्रे येथे आहेत. कार्यालयात सर्व कर्मचाऱ्यांना कॅबिन देणे शक्य नसल्याने पार्टिशन करून अनेक अधिकारी कर्मचारी येथे काम करतात. असे प्लायवूड पार्टिशन देखील अत्यंत खराब झालेले असून त्यावर रेनकोट टांगण्यात येत असल्याचे दिसून येते. त्यामुळे एकीकडे एवढ्या सुंदर इमारती, स्टेशन्स सिडकोने बांधले मात्र सिडकोच्याच कार्यालयाच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

**पावसाळी पूर्व कामे ऐन पावसाळ्यात**

इमारत जुनी असून जिन्यातील फरशी तुटलेल्या, अनेक ठिकाणी प्लास्टर पडलेले, जिन्याचे कठडे नसणे, अपुरी प्रकाश योजना, खिडक्यांची नादुरुस्त तावदाने, अशा अनेक समस्या इमारतीत आहेत. शहर निर्मिती करणाऱ्या सिडकोच्या अशाही अवस्थेत सिडको कर्मचारी मान खाली घालून काम करतात. मात्र अति खराब अवस्था झाल्यानंतर सिडकोला जाग आली आणि त्याची डागडुजी ऐन पावसाळ्यात सुरू केली. त्यामुळे केवळ म्हणायला डागडुजी सुरू आहे, मात्र पावसामुळे काम ठप्प अशी अवस्था असल्याचे येथे काम करणाऱ्या व्यक्तीने सांगितले.

# वसई विरार महापालिकेच्या माजी आयुक्तांवर ईडीची कारवाई



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई:-** वसई विरार महापालिकेचे तत्कालीन आयुक्त अनिलकुमार पवार यांच्यावर मंगळवार सकाळपासून सक्तवसुली संचलनालयाची कारवाई सुरू झाली आहे. वसईच्या दिनदयाळ नगर येथील शासकीय बंगल्यात तसेच अन्य १२ ठिकाणी ही कारवाई सुरू आहे. मागील ६ तासांपासून ही कारवाई सुरू आहे. अनिलकुमार पवार हे जानेवारी २०१२ पासून वसई विरार महापालिकेचे आयुक्त तसेच प्रशासक हणून कार्यरत होते. नुकतीच त्यांची मुंबई महानगर झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी ठाणे येथे बदली झाली होती. बदलीनंतरही ते आठवडाभर पालिकेत कार्यरत होते.

सोमवारी त्यांचा महापालिकेच्या मुख्यालयात छोटेखानी निरोप समारंभ पार पडला होता. मात्र या निरोप समारंभाच्या अगदी दुसऱ्याच दिवशी त्यांच्यावर ईडीची कारवाई झाली आहे. त्यांच्या वसईतील दिनदयाळ नगर येथील शासकीय बंगला तसेच मुंबई, नाशिक मधील मधील १२ ठिकाणांवर कारवाई सुरू आहे. खुद्द पालिकेचे माजी आयुक्तच ईडीच्या रडारवर आल्याने वसईत खळबळ उडाली आहे. माजी नगरसेवक धनंजय गावडे यांनी केलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. मे महिन्यापासू ईडीच्या कारवाईचे सत्र सुरू आहे. पालिकेचे निलंबित नगररचना उपसंचालक वाय एस रेड्डी यांच्या हैद्राबाद येथील निवासस्थानी छापे टाकून कोट्यवधींचे घबाड जप्त करण्यात आले होते. त्यापाठोपाठ बडे व्यावसायिक, सनदी लेखापाला, वास्तुविषारद आदींवर कारवाई झाली होती.

# कलानी समर्थक नगरसेवक भाजप प्रदेशाध्यक्षांच्या संपर्कात ? उल्हासनगरमध्ये राजकीय चर्चांना उधाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, शत प्रतिशत भाजप, अशी तयारी महायुतीमधील भाजपने सुरू केली आहे. मुंबई महापालिका वगळता, ग्रामीण भागात महायुतीमध्ये राजकीय लढाई होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबईत भाजपने संघटन वाढवण्याची आणि ते बळकट करण्याची तयारी सुरू केली आहे. त्यामुळे महायुतीमधील मित्रपक्षांसह विरोधकांचे पदाधिकारी भाजपमध्ये आले, तरी त्याचे स्वागत केले जात आहे. उल्हासनगरमध्ये देखील भाजप मोठी उलथापालथ करण्याच्या तयारीत आहे. कलानी समर्थक भाजपच्या संपर्कात असल्याची माहिती समोर आली आहे.

कलानी समर्थक असलेल्या काही नगरसेवकांनी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि प्रवक्त्या श्वेता शालिनी यांची भेट घेतल्याने उल्हासनगरमध्ये राजकीय उलथापालथीच्या चर्चांना उधाण आले. येत्या दोन दिवसांत हे नगरसेवक भाजपमध्ये जाहीर प्रवेश करणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.

उल्हासनगर आणि कलानी असं काही समीकरण आहे. परंतु कलानी समर्थकांनी भाजप प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी भेट घेतल्याने उल्हासनगरची राजकीय गणितं भाजपच्या हाती जाणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. कलांनी यांची उल्हासनगरवर एकहाती राजकीय पकड राहिली आहे.

कलानी समर्थकांनी भाजप प्रदेशाध्यक्षांची भेट घेतल्याने ही पकड काहीशी सैल झाल्याची चर्चा आहे. पप्पू कलानी व दिवंगत ज्योती कलानी यांनी आमदारकी भूषविली आहे. ओमी कलानी यांची पत्नी पंचम कलानी यांनीही महापौरपद भूषवले आहे. 2017 च्या महापालिका निवडणुकीत ओमी कलानी यांनी भाजपसोबत हातमिळवणी केल्याने पालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपचा महापौर बनला होता. आता कलानी समर्थकच भाजपकडे गेल्याने ओमी कलानी राजकारणात कोणता निर्णय घेणार, याकडे लक्ष लागले आहे.

# गडकरी रंगायतन लवकरच सेवेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - ठाणे शहरामध्ये ४५ वर्षांपुर्वी उभारण्यात आलेल्या गडकरी रंगायतन नाट्यगृहाच्या नुतनीकरणाचे काम करण्यात येत आहे. या नाट्यगृहाच्या दुरुस्तीचे काम पुर्ण होत असून आता तिथे बसविण्यात आलेली विद्युत यंत्रणेची तसेच ध्वनीक्षेपकाच्या आवाजाची पातळीची तपासणी येत्या दोन दिवसांत करण्यात येणार आहे. यामुळे गेल्या काही महिन्यांपासून बंद असलेले रंगायतन आता १५ ऑगस्टपर्यंत खुले होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या मासुंदा तलावाच्या काठालगतच हे नाट्यगृह आहे. १९८० मध्ये या नाट्यगृहाची उभारणी करण्यात आली. या नाट्यगृहात नाटक तसेच इतर सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी नागरिक मोठ्या संख्येने येतात. नाटक पाहण्यासाठी येणाऱ्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या मोठी आहे. या नाट्यगृहात उदवाहकाची व्यवस्था नव्हती. यामुळे ज्येष्ठ नागरिकांना जिने चढावे लागत होते. यामुळे त्यांची दमछाक होत होती. तसेच या नाट्यगृहाचे बांधकाम ४५ वर्षे जुने असल्याने ना दुरुस्त झाले होते. या बांधकामाची काही वर्षांपुर्वी तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली होती. आता नाट्यगृहात पुन्हा दुरुस्तीचे काम निघाले होते.



# शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने शाडू मातीची मूर्ती बनविण्याची कार्यशाळा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शिवसेना कल्याण पश्चिम पारनाका विभागाच्या वतीने सालाबाद प्रमाणे याही वर्षी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शाडूच्या माती पासून गणपती बनविण्याची कार्यशाळा नुकतीच आयोजित केली होती. या कार्यशाळेस सुमारे ५५ इच्छुकांनी सहभाग घेऊन शाडूच्या मातीचे गणेश मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण घेत अत्यंत उत्साहात मुर्त्या बनविल्या.

या कार्यक्रमास शिवसेना माजी शहरप्रमुख सचिन बासरे, कल्याण शहर प्रमुख बाळा परब, माजी शिक्षण समिती अध्यक्ष प्रा उदय सामंत, मूर्तिकार शिल्पकार प्रशांत गोडांबे, शेखर ईश्वाद, मीनल लेले, विकास पाटील, संतोष पष्टे, उप जिल्हा संघटक सुनिता लेकावले, महिला संघटिका मीनल कांबळी, सोनाली पष्टे, उप शहरसंघटक सुभाष पेणकर, ज्येष्ठ शिवसैनिक विजय ढोले, विभाग संघटक वैभव हरदास, प्रविण कबाडी, ग्राहक संरक्षण कक्षाचे प्रथमेश पुण्यार्थी, मोहन पिंपळखरे व बिग बॉस कलाकार संतोष चौधरी उर्फ दादूस हे आवर्जून उपस्थित राहिले होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्या साठी शिवसेना उपशहर प्रमुख दिनेश शेटे, सारंग केळकर, शाखाप्रमुख पंकज माने, शाखा संघटक अश्विनी नाडकर, प्रफुल लांडगे, अमित गोरे, विकास कुलकर्णी, ठोंबरे, आदित्य फडे, संतोष पष्टे, गजेंद्र ताम्हणे यांनी मौलाचे सहकार्य केले.

# वालधुनी नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती द्या

## वालधुनी नदी स्वच्छता संघर्ष समितीची प्रदूषण महामंडळाकडे मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : वालधुनी नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रदूषण महामंडळाने काय कामगिरी केली याची माहिती देण्याची मागणी वालधुनि नदी स्वच्छता संघर्ष समितीच्या अध्यक्षा पुष्पा रत्नपारखी यांनी प्रदूषण महामंडळाकडे पत्राद्वारे केली आहे.



वालधुनी नदीमध्ये सध्या वाहत असलेले पाणी हे गटारीपेक्षाही जास्त दूषित आहे. परिसरात याची खूप दुर्गंधी पसरते, तरी या नदीतील पाण्याची प्रदूषण पातळी तपासली आहे का, जर तपासली असेल तर याची ठेवलेली नोंद मिळावी. या नदीच्या किनारी मोठमोठी संकुले उभी आहेत व हजारोच्या संख्येने नागरिक वास्तव्यास आहेत. या दुर्गंधीचा त्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे. तसेच या वालधुनी नदीचे पाणी पुढे गांधारी येथून खाडीत मिळते व पर्यायाने खाडीचे पाणी देखील दूषित झाले आहे.

तसेच सध्या तयार झालेले संकुल साई निर्वाणा व बिर्ला वन्य, या ठिकाणी आधी फॉरेस्ट जागा होती ती दिसत नाही. तसेच कांदळवन, हरित लवादा व सीआरझेड पट्टा सुद्धा निदर्शनास येत नाही. नदी पात्रात होणारे अतिक्रमण रोखण्याच्या उद्देशाने, ठाणे मुंबई येथे संरक्षित पट्टा तयार करून नदीला जीवनदान देण्याचा शक्यतो प्रयत्न केला जात आहे. तसे कल्याण पश्चिम मधून वाहणारी वालधुनी नदी बाबत विचार करावा. प्रदूषण महामंडळातर्फे वालधुनी नदीची प्रदूषण पातळी दर्जा टिकवण्यासाठी काय प्रयत्न केला आदींची माहिती देण्याची मागणी पुष्पा रत्नपारखी यांनी केली आहे.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक गणेशोत्सव आरास स्पर्धा - २०२५

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनंतचतुर्दशी पर्यंतच्या सार्वजनिक गणेशोत्सव सजावटीसाठी ठाणे महानगरपालिकेतर्फे आरास स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना पाहिले बक्षीस रु. २५,०००/-, दुसरे बक्षीस रु. २०,०००/- व तिसरे बक्षीस रु. १५,०००/- अशी अनुक्रमे एकूण चार बक्षीसे, स्मृतीचिन्हे आणि प्रशस्तीपत्रकासह देण्यात येतील. बक्षीस देताना देखाव्याचे कलात्मकतेबरोबर उद्देशही विचारात घेतला जाईल. कोणत्याही धर्मविषयी असहिष्णू वृत्ती प्रकट करणा-या देखाव्यांचा बक्षिसांसाठी विचार केला जाणार नाही. तसेच उत्कृष्ट मुर्ती आणि स्वच्छता या साठी पारितोषिके देण्यात येतील. सार्वजनिक गणेशोत्सव आरासस्पर्धे मधील सहभागी मंडळांना निर्धारीत केलेल्या अटी व शर्ती लागू राहतील. या स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणा-या संस्थांना तसेच गणेशोत्सव मंडळांना अर्जाचा नमुना, माहिती व जनसंपर्क विभाग, महापालिका भवन, पहिला मजला, पाचपाखाडी, ठाणे (पश्चिम) येथे जाहिरात प्रसिध्द झालेल्या तारखेपासून सकाळी ११.०० ते १.३० व दुपारी २.३० ते ५.०० या वेळेत (सुट्टीचे दिवस सोडून) मिळू शकतील. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख १४ ऑगस्ट, २०२५ अशी असून हया मुदतीनंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठामपा/पिआरओ/४७२/२०२५-२६
दि:२९.०७.२०२५

सही/-
उपआयुक्त (जनसंपर्क),
ठाणे महानगरपालिका,ठाणे

Pls visit our oficial web-site
www.thanecity.gov.in



**उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर**
**महिला व बालकल्याण विभाग**

गरीब व होतकरु मुलींसाठी संधी

**जाहिर सुचना**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलींकरीता
"NEET/JEE/CET" अभ्यासक्रमासाठी मार्गदर्शन वर्गात प्रवेश '

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना कळविण्यात येते की, उल्हासनगर महानगपालिका क्षेत्रातील मुलींना शैक्षणीक आणि सामाजिक सुरक्षितता मिळणेच्या उद्देशाने सन २०२५-२०२६ च्या आर्थिक वर्षामध्ये "NEET /JEE /CET अभ्यासक्रमासाठी मार्गदर्शन वर्गात प्रवेश " हि योजना उल्हासनगर महानगपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येत आहे.

उल्हासनगर महानगपालिकेच्या क्षेत्रातील रहिवाशी असणाऱ्या गरजू दारीद्रय रेषेखालील / आर्थीक दृष्ट्या दुर्बल. असणाऱ्या मुलींना सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यात सदर अर्ज पुर्ण भरुन दिनांक २९/७/२०२५ ते दिनांक ६/८/२०२५ पर्यंत महिला व बालकल्याण विभाग, मुख्य इमारत, तिसरा मजला, उल्हासनगर- ३ येथे कार्यालयीन वेळेत जमा करावयाचे आहे. तसेच सदरचा अर्ज महापालिकेच्या संकेतस्थळावर देखिल पाठविण्यात यावा. या योजनेचा अर्ज महिला व बालकल्याण विभागात तसेच उल्हासनगर महानगपालिकेच्या संकेतस्थळ www.umc.gov.in यावर देखिल प्रसिध्द करण्यात आले आहे.

सदरचे योजनेचा अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख दिनांक ०६/०८/२०२५ असणार आहे. तसेच सदरचा योजनेला खालील नमुद अटी व शर्तीस पात्र असलेली विद्यार्थीनी पात्र असेल.

1) लाभार्थी हा उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वास्तव्य करीत असल्याबाबतचा पुरावा म्हणून रेशनकार्ड, आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, मतदार यादीतील नोंदीचा पुरावा किंवा अन्य असा योग्य पुरावा सादर करावा लागेल.
2) लाभार्थी हा अर्थिक दृष्ट्या दुर्बल असावा तसेच कुटूबांचे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाख पेक्षा जास्त नसावे. (पिवळे/ केशरी रेशन कार्ड धारकाला प्राधान्य देण्यात येईल)
3) किमान १५ वर्षे वयोगट तसेच १० वी उत्तीर्ण मुली ज्यांना NEET / JEE / CET अभ्यासक्रमासाठी प्रवेश घ्यायचा आहे असे लाभार्थी अर्ज करण्यास पात्र. (१० वी उत्तीर्ण प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी)
4) अर्जदाराने पासपोर्ट साईज आकाराचे दोन फोटो देणे (एक अर्जाला लावून देणे व एक सोबत जोडणे.)
5) एका कुटूंबातील एकाच लाभार्थ्याला प्राधान्याने या योजनेचा लाभ घेता येईल.
6) जात प्रमाणपत्र असल्यास त्याची छायांकित प्रत सोबत जोडाzवी.
7) अंतीम निवड पध्दती व अटी व शर्ती बाबत काही बदल करावयाचे असल्यास कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी राखून ठेवलेला आहे.
8) शालांत परिक्षेत प्राप्त गुणांनुसार लाभार्थी ठरविण्यात येतील.

मा. प्रशासक तथा आयुक्त यांच्या मान्यतेने.

सही/-
सहाय्यक आयुक्त (मबाकवि)
उल्हासनगर महानगरपालिका

Ple. visit our official web-site- www.umc.gov.in
जा. क्र./उमपा/पीआरओ/२०९/२०२५ दिंनाक :- २९/०७/२०२५


# फेरीवाल्यांच्या प्रश्नावर ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली केडीएमसी आयुक्तांची भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली रेल्वे स्थानक परिसर फेरीवाला मुक्त करण्यासंबंधी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शहर प्रमुख अभिजित सावंत यांचे डोंबिवली स्टेशन परिसरात गेल्या ९ दिवसांपासून उपोषण सुरु आहे. चालू असलेल्या उपोषणाच्यावतीने आज माजी महापौर आरती मोकल, माजी महापौर अनिता दळवी, संपर्क संघटक मृणाल यदनेश्वर, जिल्हा संघटक वैशाली राणे दरेकर आणि शहर संघटक अक्षरा पटेल यांनी आज कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी भेट घेऊन चर्चा केली.



डोंबिवली रेल्वे स्टेशन १५० मिटर फेरीवाला मुक्त झाला पाहिजे. डोंबिवली रेल्वे स्थानका बाहेर फेरीवाल्यांचा कब्जा आहे. रेल्वे स्थानकापर्यंत जायचं असेल तरी वाहनं स्थानकापर्यंत पोहचू शकत नाहीत. राजकीय वरदहस्त, शासकीय अनास्था यामुळे सुसंस्कृत डोंबिवली अशी ख्याती असणाऱ्या डोंबिवलीची बजबजपुरी झाली आहे. यातील काही फेरीवाल्यांचीएवढी दादागिरी आहे की ते नागरिक, नगरसेवक, शासकीय अधिकारी यांना मारहाण करायला पण मागेपुढे पहात नाहीत. डोंबिवलीची स्मार्ट सिटी करायची असेल तर डोंबिवली रेल्वे स्थानक फेरीवाला मुक्त झालाच पाहिजे याकरिता अभिजित सावंत यांनी आमरण उपोषण सुरू केलं आहे.

या उपोषणाचा बुधवारी १० वा दिवस असून सकाळी १० वाजता कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाचे १० वे उपोषण स्थळी पिंडदान करून करण्यात येणार असून समस्त डोंबिवलीकरांनी "प्रशासनाच्या पिंडावर पाणी सोडायला नक्की या असे आवाहन शहर प्रमुख अभिजित सावंत यांनी केले आहे.

# राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : दरवर्षी शिक्षक दिनानिमित्त प्रातिनिधिक स्वरूपात शिक्षकांना क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. सन २०२५ च्या पुरस्कारासाठी इच्छुक शिक्षकांनी ३१ जुलै २०२५ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षण संचालक महेश पालकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

या पुरस्कारासाठी राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व मान्यताप्राप्त अनुदानित खासगी प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांनी आपली आवेदने ३१ जुलै २०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत https://forms.gle/ixTDiuvgqqEwVuaA7 या लिंकवर ऑनलाईन सादर करावीत, असे पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# पर्यटन क्षेत्राच्या प्रचार व ब्रँडिंगसाठी नव्या धोरणांची अंमलबजावणी

## महाराष्ट्र शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : राज्यातील पर्यटन उद्योगाच्या प्रचार व प्रसारासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. दिनांक 30.04.२०२५ पासून अंमलात आलेल्या शासन निर्णयानुसार, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील खाजगी आयोजनकर्त्यांच्या माध्यमातून आयोजित होणाऱ्या पर्यटन विषयक कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्राच्या पर्यटनाच्या प्रतिमानिर्मिती आणि ब्रँडिंगसाठी खास धोरणे अंमलात आणली जात आहेत. या योजनेअंतर्गत स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या संस्थांना अनुदान व सहकार्य दिले जाणार आहे. यात खाजगी संस्था, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था व अन्य आयोजक समाविष्ट आहेत. पर्यटन व सांस्कृतिक वारसा, साहसी पर्यटन, खाद्य महोत्सव, क्राफ्ट व हँडीक्राफ्ट प्रदर्शन, MICE इव्हेंट्स (मीटिंग, प्रेझेंटेशन, एक्झिबिशन), डिजिटल मोहिमा, मीडिया टूर, फॅम टूर, इत्यादी उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाणार आहे.

### महत्त्वपूर्ण बाबी व उपक्रम

पर्यटन क्षेत्रातील ब्रँडिंग: महाराष्ट्र पर्यटन विभाग वार्षिक पर्यटन विपणन आणि ब्रँडिंग योजना तयार करणार असून, त्याअंतर्गत प्रचार उपक्रम राबवले जातील.प्रचार साहित्य निर्मिती: OTT प्लॅटफॉर्म, डिजिटल मीडिया, दूरचित्रवाणी, रेडिओ, फील्ड इव्हेंट्स व लोकशाहीरांच्या माध्यमातून महाराष्ट्र पर्यटनाचा प्रचार केला जाईल. Social Media Influencer चा वापर: १ लाख फॉलोअर्स असलेल्या प्रभावी इन्फ्लुएंसर्सकडून महाराष्ट्र पर्यटनाशी संबंधित साहित्य तयार करून त्याद्वारे प्रभावी जनजागृती केली जाणार आहे.

### उच्चस्तरीय समितीची स्थापना

पर्यटन विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, गृह व सांस्कृतिक कार्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी सदस्य म्हणून असतील. ही समिती पात्र प्रस्तावांना मान्यता देणार आहे.

### प्रस्ताव सादर करण्यासाठी नियमावली

पात्र संस्था ही नोंदणीकृत संस्था असावी. प्रस्ताव सादर करण्यासाठी ऑनलाईन प्रणालीवर अर्ज करणे आवश्यक आहे. प्रस्तावात कार्यक्रमाचा तपशील, उद्दिष्ट, खर्चाचा तपशील, प्रचार माध्यमे, अपेक्षित लाभ इत्यादींचा समावेश असावा.

मंजूर प्रस्तावासाठी निश्चित वेळेत 'Statement of Expenditure' सादर करणे बंधनकारक आहे.

इतर अटी व शर्ती - पर्यटन विभागाच्या लोगोचा वापर पर्यटन विभागाच्या संमतीने करावा लागेल. नियोजित कार्यक्रम पर्यटन विभागाच्या उद्दिष्टांशी सुसंगत असावा. मान्यताप्राप्त मीडिया संस्थांकडून प्रसिद्धी करण्यात यावी. कार्यक्रमात महाराष्ट्र पर्यटन विभागाचे प्रतिनिधित्व आवश्यक आहे.अधिक व तपशिलवार माहितीसाठी शासन निर्णय क्र. महोत्सव-2018/12/प्र.क्र.1126/ पर्यटन-3 दि. 30 एप्रिल 2025 पाहावा. हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक 202504301806054523 असा आहे.या योजनेंतर्गत राज्यातील विविध संस्थांना पर्यटनविषयक कार्यक्रम आयोजनासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मार्गदर्शन मिळणार असून, पर्यटन क्षेत्राचा विस्तार व प्रचार करण्यासाठी ही योजना एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

# निवृत्त शिक्षक व विस्तार अधिकारी (शिक्षण) न्यायाच्या प्रतीक्षेत!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण: भिवंडी पंचायत समिती शिक्षण विभागातून निवृत्त झालेले विस्तार अधिकारी व निवृत्त शिक्षक, मुख्याध्यापक गेल्या ३-४ महिन्यांपासून निवृत्ती वेतन व हक्काच्या देण्यांपासून वंचित असल्याने त्यांच्या मधून प्रचंड नाराजीचा सूर उमटत आहे . शहापूर तालुक्यातील निवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन आदेश प्राप्त झाले असून भिवंडी पंचायत समिती मधून आरोग्य खात्यातील निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यानाही भविष्यनिर्वाह निधी, सेवा निवृत्ती उपदानाचे सर्व पैसे प्राप्त झाले आहेत. मग शिक्षण खात्यातील शिक्षकांना हक्काची देणी मिळणे कामी घोडे कुठे अडले आहे ?असा संतप्त सवाल विचारला जात आहे याबाबत भिवंडी तालुका प्राथमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी यांनी दैनिक जीवनदीप वार्ताशी बोलताना सांगितले.

एका कर्मचाऱ्याचे कमीत कमी ३० ने ४० लाख रुपये धरल्यास SBI बँकेच्या नियमानुसार ८ टक्के व्याजाने महिन्याला हजारो रुपयांचा तोटा आजमितीस त्यांना सहन करावा लागत आहे. भिवंडी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संजय अस्वले यांच्या दृष्टीने हा विषय आर्थिक फायदयाचा नसल्याने ते जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे विदारक चित्र दिसत आहे . पंचायत समिती स्तरावरून निवृत्तांची सेवापुस्तक ठाणे येथे पाठवताना ती परिपुर्ण न पाठवता वारंवार त्यात चुका ( त्रुटी) असल्याने सेवापुस्तक ४-५ वेळा ठाणे येथून परत येत असतात. पुन्हा त्रुटी दूर करून ती पाठविन्यासाठी कमीत कमी २ ते ३ आठवडे लागतात. या अक्षम्य दिरंगाई मुळे निवृत्तांना आर्थिक ओढाताण सहन करायची पाळी आली आहे. तसेच त्यांचे बँकांमध्ये असलेले कर्ज फेडण्यासाठी ही त्यांना मोठी कसरत करावी लागत आहे आज पर्यंत पाठवलेल्या काही सेवा पुस्तिकांवर व त्यावरील सहपत्रावर दिनांक नाही,चौकशी अहवाल (दाखला) दिनांक नाही, सेवानिवृत्त आदेश जोडले नाही. पेन्शन केस सोबत तपासणी सूची जोडली नाही. वचन पत्राची नोंद सेवापुस्तकात नाही.वरील त्रुटी सरसकट सर्व शिक्षकांच्या बाबतीत झालेल्या आहेत. शिक्षण विभाग प्रमुखांनी वरील त्रुटी दूर करून निवृत्त शिक्षकांना दिलासा देऊन न्याय मिळावा अशी मागणी शिक्षक संघटनेने केली आहे. काही निवृत्त शिक्षकांनी प. स. कार्यालयात चौकशी केली असता निवृत्त शिक्षकांना स्वतः ठाणे येथे जाऊन तुम्ही प्रयत्न करा असा सल्ला दिला जातो यामुळे निवृत्त शिक्षक, मुख्याध्यापक, विस्तार अधिकारी यांच्याकडून कमालीचा संताप व्यक्त होत आहे. मात्र या कार्यालयातील गट शिक्षण अधिकारी प्रतिनियुक्ति बदल्या, RTE (दारिद्र्य रेषेखाली) पालकांच्या पाल्यांना नामांकित शाळेत प्रवेश मिळवून देणे. समायोजन प्रक्रियेत बदल्या झालेल्या शिक्षकांच्या नियमबाह्य बदल्या फिरवणे या विषयात खूप इंटरेस्ट आहे.शाळा - पालीवली, बोंबे पाडा, कवाड, मडके पाडा, राहनाळ, लाखात पाडा , जुलई पाडा, केवणी दिवे, खारबाव येथील शिक्षक गेल्या २-३ वर्षांपासून ( तूर्त ) अध्यापनासाठी शिक्षकांच्या सोयीनुसार अस्वले यांनी त्यांना नियम बाह्य बदल्या दिल्या आहेत. वास्तविक प्रतिनियुक्ति कालावधी ६ महिन्यांपेक्षा जास्त नसावा हा नियम आहे. मग ठराविक शिक्षकांवर एवढी मेहेरबानी का? सन २०२४ च्या संचमान्यतेनुसार ऑनलाईन बदली झालेल्या शिक्षकांना १ महिन्या नंतर अंशतः बदल करून सोयीप्रमाणे शाळा दिल्या असल्याचे बोलले जाते २०२५ च्या संचमान्यतेनुसार एका शिक्षकास समुपदेशनाने दिलेली डोंगराळी शाळा अवघ्या एका तासात बदलून दिली जाते तर डोंगराळी शाळेत 6 सहा पटसंख्या असताना दोन शिक्षक, आणि वाघिवली शाळेत ३८ पट असताना ३ शिक्षक कार्यरत आहेत. धामणे शाळेत 15 मे ला पदवीधर (विज्ञान) हजर झालेली शिक्षिका कार्यमुक्त आदेश न घेता परस्पर गुदवली येथे प्रतिनियुक्तीवर गेल्या.

तालुक्यातील अनेक शाळा १५०-२०० पट संख्यांचे असताना ३ ते ४ शिक्षक आठ वर्गाचा कार्यभार सांभाळतात मग प्रश्न असा पडतो की शिक्षकांच्या प्रतिनियुक्त्या विद्यार्थी हितासाठी आहेत का शिक्षकांच्या सोयीसाठी.

शिक्षण हक्क कायद्यानुसार (आर. टी. इ) काही पालकांनी सादर केलेले उत्पन्नाचे दाखले, निवासी पत्ते शाळेपासूनचे अंतर 15 ते 20कि.मी.हे सर्व बोगस असतानाही अस्वले यांच्या आशीर्वादाने अनेक पाल्यांना नामांकित शाळेत प्रवेश मिळतो हे कसे ?

मागील २ वर्षांपासून सन २०२३-२४ व २०२४-२५ वर्षात विद्यार्थी क्रीडास्पर्धा साठी जवळ जवळ साडेतीन लाख रुपये जिल्हा स्तरावरून प्राप्त झाले आहेत असे समजले. तालुका स्तर विजयी विद्यार्थी स्पर्धक यांना प्रवासासाठी लागणारा खर्च एक रुपयाही दिलेला नसल्याची ही चर्चा होताना दिसत आहे कबड्डी खोखो च्या खेळाडूंना दिलेले स्पोर्ट्स चे बूट ईयत्ता पहिली च्या मुलांच्या मापाचे होते वरील सर्व विषयांमुळे अनेक निवृत्त शिक्षक विस्तार अधिकारी संताप व्यक्त करत असून त्याची सखोल चौकशी करून न्याय मिळावा व झालेला अन्याय दूर करावा अशी मागणी सध्या जोर धरत असून याबाबत लवकरच भिवंडी तालुका प्राथमिक शिक्षक संघटना पालकांना घेऊन जाब विचारणार असल्याची चर्चा सध्या जोरात सुरू आहे .

# पहलगाम हल्ल्यातील संजय लेले यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली मिळाली - हर्षल लेले

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भारतीय सैन्याने जम्मू-काश्मीर पोलिस आणि सीआरपीएफ यांच्यासमवेत दहशतवादविरोधी मोहीम सुरू केली होती. याअंतर्गत पहलगाम हल्ल्याच्या मास्टरमाइंडसह ३ दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. ही बातमी मिळताच डोंबिवलीतील दिवंगत संजय लेले यांचे पुत्र हर्षल लेले यांनी प्रतिक्रिया देत म्हटले की, आज त्यांच्या वडिलांना खरी श्रद्धांजली मिळाली आहे.

सोमवारी पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या तीन दहशतवाद्यांना भारतीय सैन्याने ठार मारले. पहलगाम हल्ल्यात शहीद झालेले डोंबिवली येथील संजय लेले यांचा मुलगा हर्षल लेले यांनी माध्यमांना सांगितले की, रविवारी माझ्या वडिलांचा वाढदिवस होता. मी त्यांच्या वाढदिवशी प्रत्येक वेळी केक घेऊन येत असे. काल त्यांचा पहिला वाढदिवस होता जेव्हा ते आमच्यात नव्हते. भारतीय सैन्याने पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांना ठार मारले आहे, त्यामुळे मला असे वाटले की माझ्या वडिलांना त्यांच्या वाढदिवशी भेट मिळाली आहे.

हर्षल म्हणाले की, भारतीय सैन्याने दहशतवादाविरुद्ध कारवाई सुरू ठेवली आहे. अनेकदा असे घडते की हल्ले होतात आणि नंतर लोक विसरतात, परंतु पहलगाम हल्ल्यानंतर लष्कराने दहशतवाद्यांविरुद्ध कारवाई सुरू ठेवली आहे, ज्यामुळे मला खूप आनंद होतो. देशावर हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांचा कायमचा खात्मा करणे आवश्यक आहे. तसेच पाकिस्तानसोबत कोणताही क्रिकेट सामना होऊ नये अशी भावना हर्षल लेले याने व्यक्त केली.

# भाऊसाहेब नेने महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि नागरी संरक्षण दल, उरण-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्ती व्यवस्थापन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.सदर कार्यक्रमासाठीपेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड.मंगेश नेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप नागरी संरक्षण दल उरण रायगड, मधील शशिकांत शिरसाट सहाय्यक उपनियंत्रक हरेश्वर जनार्दन ठाकूर मानसेवी अधिकारी आणि मानसेवी निर्देशक, अभिमन्यू गोवारी, आकांशा देठे, उपासना गावंड, राजेश म्हात्रे, प्रणित म्हात्रे, साहिल ठाकूर, श्रेयश पाटील, कल्याणी पवार, तृणाली पाटील, साक्षी पाटील, जतीन पाटील, हर्ष मोकल ,प्राची दळवी, अभिकेत म्हात्रे, जयेश पाटील, हस्तिका, श्रेयश पाटील इत्यादि नागरी संरक्षण दल मधील अनुभवी स्वयंसेवक, रा. से. यो चे कार्यक्रम अधिकारी डॉ टी.



डी. माळवे, डॉ. एस. डी. लकडे, प्रा. एस. एस. पितळे व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी या महत्वपूर्ण उपक्रमाच्या आयोजनाबाबत रा. से. यो चे कौतुक करत शिबीरार्थींना प्रशिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आणि सदैव समाजहितासाठी कटीबद्ध राहण्याचे आवाहन केले. नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांना आपत्ती व्यवस्थापनाबद्दल माहिती व प्रात्यक्षिके करून दाखवले, संरक्षण का? कसे? केव्हा? आर्मी नेव्ही एअर फोर्स प्रमाणे नागरी संरक्षण दल हा फोर्थ इंडिया आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापनात स्वयंसेवकांच मदतनीस म्हणून कार्य कस करायचं असतं हे समजावून सांगितले.तसेच विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण झाल्यानंतर आपत्ती व्यवस्थापनेची सखोल माहिती देण्यात आली तसेच प्रत्यक्ष प्रात्यक्षिके करून दाखवली विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न केला त्याचबरोबर जर एखाद्या आग आणि आगीची तत्वे ह्याबाबत माहिती देण्यात आली याचं प्रशिक्षण त्यांनी दिले, दोरी व गाठीचे प्रकार, श्वासावरोध व कृत्रिम श्वसन पद्धती ह्याबाबत व्याख्यान आपण प्रशिक्षणात काय- काय शिकलो? याचा आढावा घेतला आणि विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांना प्रमाणपत्रही देण्यात आले.

.. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदानंद धारप सर यांनी प्रोत्साहन दिले व सभागृह उपलब्ध करून दिले तसेच पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड .मंगेशजी नेने यांनी या कार्यक्रमासाठी महत्त्वपूर्ण असे प्रोत्साहन देऊन आपत्ती व्यवस्थापन किती महत्त्वाचे आहे ?हे समजावून सांगितले.

आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेच्या समारोपा प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय प्राचार्य डॉ. सदानंद धारप , पी.एस.आय रसाळ साहेब ,ए.एस. आय घरत साहेब,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. तुकाराम माळवे, डॉ. सुभाष लकडे, प्रा. सौ.सायली पितळे आणि त्यांच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांना सदर शिबीरात सहभाग होण्यासाठी प्रोत्साहित केले.






*Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*